महाराष्ट्र शासन.

सार्वजनिक बांधकाम विभाग

## कार्यकारी अभियंता

## सार्वजनिक बांधकाम विभाग जालना.

# नागरी सनद

# सुची


| अ.क्र. | तपशिल. | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १ | प्रस्तावना | १ | २ |
| २ | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग जालना कार्यालयाची बांधिलकी. | ३ | ३ |
| ३ | नागरिकाकडून अपेक्षा. | ३ | ४ |
| ४ | कार्यकारी अभियंता, सा.बां विभाग जालना कार्यालयाची रचना. | ४ | ४ |
| ५ | विभांगांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रकी माहितीची सुलभता | ५ | ५ |
| ६ | विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता. | ५ | ५ |
| ७ | नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण. | ६ | ६ |
| ८ | सनदेचा आढावा. | ६ | ६ |
| ९ | जनसामान्यांकडून सुचना. | ६ | ६ |
| १० | सनदेची अंमलबजावणी. | ७ | ७ |
| ११ | परिशिष्टे. | ७ | ७ |


# परिशिष्ट-ब.

| अ.क्र. | सेवांचा तपशिल. | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचा-यांचे नांव व हुददा. | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुददा. |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग ८,९ आणि मजूर, कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ३० दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| २ | विश्रामगृहाचे आरक्षण पत्र. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ७ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ३ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ३० दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ४ | चलत चित्रपटगृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १५ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ५ | सरकारी इमारतीचे ना उपलब्धता प्रमाणपत्र. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १५ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ६ | सरकारी निवास स्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता ) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ७ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ७ | सरकारी निवास स्थानी राहणा-या निवृत्त कर्म-यांच्या बाबतचे ना हरकत दाखला | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ३० दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ८ | रास्त भाडे / प्रमाण भाडे प्रमाणपत्र. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १५ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ९ | इमारतीच्या भाडयाचे निश्चिती करण. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १५ दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| १० | इमारतीचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | ३० दिवस | अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ औरंगाबाद. |
| ११ | रस्ता खोदाई करुन पाईप टाकण्यांस परवानगी. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १० दिवस | ------- |
| १२ | पिकअप शेड बाबत परवाना. | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना. | १० दिवस | ------- |

११.१

# परिशिष्ट-अ

**परिशिष्ट अ मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता ( Tree chart )**




Copy of Sanad

Copy of Sanad

# सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

# :: नागरी सनद ::

१.० **प्रस्तावना.**

सार्वजनिक बांधकाम विभाग जालना करिता प्रस्तावना करतांना नमूद करावे वाटते ते असे की, १ मे १९८१ रोजी औरंगाबाद जिल्हयाचे विभाजन होवून, पुर्वीच्या जालना तालूक्याला जिल्हयाचा दर्जा प्राप्त झाला आणि महाराष्ट्र शासनाने १९८१ साली सार्वजनिक बांधकाम विभाग जालना ची निर्मिती केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग जालना हे निर्मिती पासूनच अधिक्षक अभियंता सा.बा. मंडळ औरंगाबाद यांचे अधिनस्त असून २९ वर्षापासून यशस्वीरित्या कार्यरत आहे. कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग जालना करिता खात्याची शासकिय भव्य इमारत असून पुरेसा परिसर आहे. हे कार्यालय दुर्गामाता मंदिर परिसरा लगत मंठा रोड जालना येथे स्थानापन्न आहे.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालया अंतर्गत जालना जिल्हयातील जालना, बदनापूर, भोकरदन व जाफ्राबाद इ. तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. त्यानुसार कार्यक्षेत्रातील सार्वजनिक रस्ते, पुल, इमारतीची मुळ बांधकामे व देखभाल दुरुस्तीचे कामे केली जातात. या विभागात मुख्यत्वे करुन प्रमुख जिल्हा मार्ग/ राज्य मार्ग/ जिल्हा रस्ते/ इतर जिल्हा मार्ग आहेत. लहान व मोठे पुल राज्यमार्गावरील व प्रमुख जिल्हा मार्गावरील सि.डी. वर्क्स आहेत. तसेच कार्यालयीन इमारती असून निवासी इमारती आहेत.

जालना जिल्हयात अंबड येथे मत्सोदरी देवी मंदिर व भोकरदन तालुक्यात राजूर येथे गणपती हे देवस्थान प्रसिध्द असून, सण उत्सवानिमित्य तेथे यात्रा भरतात. त्यानुषंगाने पर्यटकाची वर्दळ असते. जालना येथील बाजार पेठ प्रसिध्द असून बांध-कामासाठी लागणारे लोखंडी सळया तसेच शेतीसाठी लागणारे बियाणे यांचे मोठया प्रमाणांत कारखाने आहेत.

सन २००१ च्या जनगणनेनूसार जालना जिल्हयाची लोकसंख्या १६,१२,३५७ असून पुरुष-महिला प्रमाण १०००:९५२ असे आहे. तसेच जालना जिल्हयात प्रचलित सर्वच जाती धर्माचे लोक आहेत.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना या जिल्हयातील सार्वजनिक बांधकामाच्या अनुषंगाने नागरिकांशी बांधिलकी जोपासण्यास कटीबध्द आहे.

हि बांधिलकी  कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम जालना या सनदेद्वारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे.  हे कार्यालय नागरीकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे.  सा. बां. विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शीतत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सोजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोण विचारात घेवून तसेच सर्व-सामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यांत आली असून खालील प्रमाणे ध्येय आहेत.

१ विभागीय कार्यालयाच्या अख्यारितील मार्गाची देखभाल दुरुस्ती मानकाप्रमाणे करुन रस्तयाचा दर्जा उत्तम राखणे.

२ कार्यालयीन विभागाच्या अख्यारितील शासकिय इमारतीची  (कार्यालयीन व निवासी इमारती ) बांधकाम खात्याने ठरवलेल्या मानकानूसार उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.

३ या विभागाच्या कार्यालयाशी् संलग्न असलेल्या सा.बां.उप विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकिय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

४ या विभागाच्या कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५ आपत्कालिन व्यवस्थेसाठी (जेसे महापुरामुळे वाहतुक बंद पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती करुन वाहतुक चालू करणे ) तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

६ विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७ या विभागीय कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८ माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अख्त्यारीतील उप अभियंता यांचेकडून मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन दणे.

९ कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागीय कार्यालयाची व उप विभागाची लोकभिमुखता वाढविणे.

१० संगणकीकरण बाबत या विभागाच्या अंतर्गत सर्व उप अभियंता कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे, अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ औरंगाबाद यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

११ या कार्यालयाच्या अंतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर ) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२ कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्यांची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१३ नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २ कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना

**अ** सेवेच्या गुणवत्तेची बांधीलकी ठेवील.

**ब** सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

**क** पारदर्शकता व निष्ठावंत सेवेसाठी वेळावेळी विविध परवानापत्रे / ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

माहितीचा अधिकार अधिनियमां अंतर्गत मागितलेली माहिती संबंधीतास वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी स्वच्छ भावनेने प्रयत्न करुन ती उपलब्ध करुन देण्यांत येईल.

## ३ नागरिकांची जबाबदारी

१ शासकिय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकाची वर्तणूक सौजन्यपुर्वक असावी.

२ नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

३ नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

४ विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पूरविण्याचा आग्रह धरु नये.

५ सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

६ नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागावर अतिक्रमणे करु नयेत.

७ रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षांचे जतन करणे ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.

८ नागरिकांनी कायदेशिर तरतूदी, नियम व अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

९ नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## ४ कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना कार्यालयाचो रचना.

अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग जालना हे कार्यालय शासनाने १९८१ ला स्थापन केले आहे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना अंतर्गत उप अभियंता, सा.बां. उप विभाग

उप विभागाची आस्थपना

या विभागाकडे आहे. तसेच रस्त्याचे चौपदरीकरणाची कामे जागतिक बँक प्रकल्प विभाग पहाते. या कार्यालयाच्या अधिपत्याखाली एकुण ५ उप अभियंता कार्यरत आहेत. तसेच कार्यकारी अभियंता जालनाच्या अधिनस्त उप विभाग यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree Chart ) परिशिष्ट--अ म्हणून सोबत जोडला आहे.

या विभागाच्या अधिकार क्षेत्रातील उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप-विभाग हा ख-या अर्थाने निर्मितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून उप अभियंता यांचे कार्यालयाकडून मिळू शकते. तसेच बांधकामावर परिपुर्ण निरीक्षण व दर्जेदार निर्मिती ही उप- विभागाच्या कार्य- कक्षेची अविभाज्य बाब आहे. प्रस्तावित नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उप- विभाग प्रत्यक्षरित्या पुरवित असतो. या विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली लेखा संहिता, विनिर्देश व वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय कार्यालयाकडून केले जाते.

## ५ विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक व माहितीची सुलभता.

### अ कार्यपुर्तीचे वेळापत्रक .

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना कार्यालयाची कार्यक्षेत्रातील, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती, तसेच रस्त, पुल व इमारती आणि इतर कामा विषयी माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट-ब ) नमूद केले आहे. अर्जाचा विहीत नमूना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहीत फी भरुन संबंधीत उप विभागीय कार्यालयात मिळू शकेल. नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नागरिकांना आवश्यक ती माहिती पुर्वोण्यास्तव प्रत्येक उप-विभागासाठी उप विभागीय अभियंता हे जनमाहिती अधिकारी व उप विभागीय लिपीक सहाय्यक जनमाहिती अधिकारी आहेत. ते त्यांच्या संबंधीत असणारे कार्य स्वतंत्ररित्या पार पाडू शकतात.

**ब माहितीची सुलभता :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवर (संकेत स्थळावरुन ) वेळावेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल. या कार्यालयाचा ई-मेल-jalna.ee@mahapwd.com असा आहे. या कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२४८२-२३०१४३ असा आहे.

## ६ कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग जालना कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता :

सार्वजनिक विभागाने रस्त्याची सुरक्षितता वाढविण्यासाठी ''**अपघात निवारण समिती ''** स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यावरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सुचविते. समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्पा-टप्याने हाती घेण्यांत येते. तपशिलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यावर लावले जातील जेणे करुन रस्ते वाहतूकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

रस्त्यावरील लहान मोठया पुलांची वर्षातून दोन वेळेस ठरल्याप्रमाणे पहाणी होतेच. तसेच आवश्यकते प्रमाणे नेहमी देखभाल व दुरुस्ती होते. रस्त्यावरील नैसर्गीक अपत्तीमध्ये निर्माण होणा-या बाबी दुरुस्ती करिता अतितात्काळ हाती घेण्यांत येतात.

## ७ गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सुचना.

अ गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण.

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य काही तक्रारी असल्यास किंवा काही कामा बाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालया-विरुध्द तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ उप विभागीय कार्यालयाविरुध्द तक्रार असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे. तक्रार नोंदवावी अशा गा-हाणी/तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालया-कडून ७ दिवसात करण्यांत येईल. तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक उपविभागीय कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यांत येत आहे. तक्रार समक्ष भेटीत / पत्राने वा ''ई-मेल '' द्वारे नागरिक मांडू शकतात.

ब **नागरिकांच्या सनदेचा आढावा.**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तते बाबतचा तथा परिणाम-कारकतेचा आढावा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना अंतर्गत घेण्यांत येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यांत येईल.

क **जनसामान्यांकडून सुचना.**

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्मानीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. तरी सा. बां. विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८ नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत या विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यांस कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना हा विभाग कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यांत येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यांत करण्यांत येतील. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहेत. विभागाच्या अखत्यारितील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्वक व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकभिमुख सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यांत येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यांत येईल.

## ९ परिशिष्टे.

**अ** मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree chart )

**ब** कार्यपुर्तीचे वेळापत्रक.

# कार्यालय

## सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

## जिल्हास्तरीय लोकशाहीदिन जि.जालना

## बैठक दिनांक ३/१/२०११ करिता संक्षिप्त अहवाल.

# कार्यालय

## सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

## भ्रष्टाचार निर्मुलन समिती जि.जालना

## बैठक दिनांक ३/१/२०११ करिता संक्षिप्त अहवाल.

# लोकशाही दिन दिनांक ३/१/२०११ वार सोमवार

## सा.बां.विभाग जालना

| अ.क्र. | टोकन क्रमांक दिनांक | विषय | तक्रारदार यांचे नांव व पत्ता | प्रकरणाची सदयस्थिती. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ३०/२००७ दि.४/६/२००७ | कुसळी ते माळेगांव रस्त्यासाठी बेकायदेशिर घेतलेल्या जमिनीचा मोबदला मिळणे बाबत | श्री संपत पुंजाजी गायकवाड रा.माळेगांव ता.बदनापुर | सदर प्रकरणी कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करुन त्यांचा चौकशी अहवाल सादर करण्या बाबत दिनांक ६/१२/२०१० रोजी मा.जिल्हाधिकारी जालना यांनी सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने सहाय्यक अभियंता श्रेणी-१ सा.बां.उप विभाग बदनापुर यांनी प्रत्यक्ष चौकशी करुन सदयस्थिती अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावर कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना यांनी त्यांची प्रतिक्रिया नमुद करुन पत्र क्रमांक ९ दि.१/१/२०११ अन्वये प्रकरण निकाली काढण्यास्तव मा.जिल्हाधिकारी जालना यांना विनंती करुन अहवाल सादर केला आहे. |
| २ | ४०/२००७ दि.१/९/२००८ | खुलताबाद फुलंब्री तळेगांव राजूर अकोला रोडवरील डांबरीकरण कामाची चौकशी करणे बाबत. | बबनराव साहेबराव गाडेकर रा. भातखेडा ता.बदनापुर | सदर प्रकरणा संबंधीत कामाची चौकशी मा.अधिक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ औरंगाबाद यांनी केलेली आहे. सदर चौकशीचा अहवाल अदयाप प्राप्त नसल्याने ते प्राप्त करुन घेण्यासाठी पत्र व्यवहार चालू आहे. -<br>परंतू दि.६/१२/२०१० च्या बैठकीत सदर प्रकरणी कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करुन अहवाल सादर करण्यास्तव मा.जिल्हाधिकारी जालना यांनी सुचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे लवकरच अहवाल सादर करण्यांत येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ३८/२००७<br>दि.४/६/२००८ | रोजगार हमी योजनेतून मंठा रोड ते मौजपुरी रस्ता फुटल्यामुळे माझे शेत गट नं.१९८ शिवार मौजपुरी चे लाखो रुपयाचे नुकसान होणे बाबत. | श्री भागवत पदमाकर देशमुख रा.मौजपुरी जालना | मा.जिल्हाधिकारी जालना यांच्या सुचनेप्रमाणे दि.३०/११/२०१० रोजी कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग जालना यांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष तक्रारदार यांचे समवेत पाहणी करुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल जे की त्या बाबत या खात्याची कसूर नसल्याचा समावेश करुन पत्र क्र.६१४२/१ दि.३/१२/२०१० अन्वये चौकशी अहवाल मा.जिल्हाधिकारी जालना यांना सादर करुन प्रकरण निकाली काढण्यास्तव विनंती केली आहे. |
| अ.क्र. | टोकन क्रमांक दिनांक | विषय | तक्रारदार यांचे नांव व पत्ता | प्रकरणाची सदयस्थिती. |
| ४ | ११/२००९<br>दि.७/१२/२००९ | जाफ्राबाद येथील सार्वजनिक रस्त्याला रोडवर जाफ्राबाद ते भोकरदन रोड व बसस्टँड पासून ते शिवाजी चौक ते अहिल्याबाई होळकर रोड चिखली टर्न पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या सरकारी जागेवर टप-या धारकांनी अतिक्रमन केलेले आहे ते तात्काळ हटविणे बाबत. | श्री रमेश देवाजी चव्हाण, जाफ्राबाद | सदर प्रकरणी संबंधीत उप अभियंता सा.बां.उप विभाग जाफ्राबाद यांनी तहसिलदार व पोलीस यंत्रणा यांना सहकार्य करण्यास्तव विनंती केली आहे. इतर यंत्रणेचे सहकार्य न मिळाल्यामुळे प्रकरणी प्रलंबित आहे. तरी लवकरच कार्यवाही हाती घेऊन अतिक्रमण हटविण्यांत येईल व तसा अहवाल सादर करण्यांत येईल. |
| ५ | २/२०१०<br>दि.२/८/२०१० | मौजे ताडकळस ते बोरगांव (जहागिर) रस्त्याच्या निकृष्ट कामा बाबत. | श्री नाना गणपत बनकर रा.ताडकळस (सरपंच) | सदर तक्रारी संबंधीतचे विषयांकीत काम चालू स्थितीत असून त्याचे डांबरीकरण होणे बाकी आहे. सन २०१० च्या पावसाळयात अतिवृष्टीमुळे रस्ता खराब झालेला होता त्यामुळे सदर तक्रार दाखल झालेली आहे. सध्या रस्त्याचे काम सुस्थितीत करण्यांत आले असून पुढील काम सुध्दा सा.बां.मानकाप्रमाणे करुन घेण्यांत येईल असा अहवाल उप विभागीय अभियंता सा.बां.उप विभाग भोकरदन यांनी सादर केलेला असून तो अहवाल कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना याचे पत्र क्रमांक दिनांक २६/१०/२०१० अन्वये मा.जिल्हाधिकारी जालना यांना सादर करुन प्रकरण निकाली काढण्यास्तव विनंती केलेली आहे. |

कार्यकारी अभियंता

सा.बां.विभाग जालना.

## भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक दि.३/१/२०११ सोमवार वेळ दुपारी १.०० वाजता.

## गोषवारा

| अ. क्र. | मुळ प्रकरण दाखल दिनांक | तक्रारदाराचे नांव व पत्ता | विषय | प्रकरणाची सदयस्थिती. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | दि.२२/६/१९९८ | श्री एस.एस. क्षिरसागर व इतर अखिल भारतीय मातंग संघ जालना | कार्यकारी अभियंता क्र.१ जालना ४/६/१९९८ व दि.१२/६/१९९८ व दि.१६/६/१९९८ रोजी अर्जदाराने कळविले असता संबंधीत अधिकारी साहेबांनी कोणतीही कार्यवाही केली नाही या बाबत. | सदर प्रकरण तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री मळेकर यांचे संबंधीत रोहयो कामाचे आहे. त्यांनी या बाबतचा अहवाल अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ औरंगाबाद येथे सादर केल्यावरुन अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ औरंगाबाद यांनी त्यांचे गोपनिय पत्र क्र.४०६ दि.१७/८/२०१० अन्वये मा.जिल्हाधिकारी जालना यांना सदर अहवाल पाठविलेला आहे. तसेच या कार्यालयाचे गोपनिय पत्र क्र.३०३/६ दि.३/९/२०१० अन्वये प्रकरण निकाली काढण्यास्तव मा.जिल्हाधिकारी जालना यांना विनंती केली आहे. सदर प्रकरणी पुलाच्या कामा बाबतचा मुददा संपुष्टात आला असून रस्त्या बाबतचा अहवाल कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी स्वतः पाहणी करुन सादर करण्यास्तव मा.जिल्हाधिकारी जालना यांच्या सुचना होत्या. त्यानुषंगाने दि.२७/१२/२०१० रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन संबंधीत गावकरी यांना विचारणा करुन रस्त्याचा सदयस्थिती अहवाल कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना यांनी पत्र क्र.दि.१/१/२०११ रोजी सादर करुन प्रकरण निकाली काढण्यास्तव विनंती केली आहे. |
| २ | दि.१०/२/२०१० | जुमान चाऊस नासेर चाऊस सदस्य जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती जालना | सार्वजनिक बांाकाम विभाग क्र.१ मधील कार्यकारी अभियंता श्री रऊफ व उप अभियंता श्री एस.जी.लोंढे यांनी काढलेल्या बनावट देयकाची चौकशी करणे, तसेच यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुरुस्तीच्या कामातील केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करणे बाबत. | तत्कालिन उप विभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी सदर प्रकरणी दि.१५/६/२०१० रोजी मा.जिल्हाधिकारी जालना यांना अहवाल अभिलेखासह सादर करुन सदर प्रकरणी निकाली काढण्यास्तव विनंती केलेली आहे. सदर अहवालात तक्रारी संबंधीत काही कामे अपुर्ण दाखवलेले आहेत. त्यामुळे अपुर्ण कामे पुर्ण करुन कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी पुन्हा अहवाल सादर करण्यास्तव मा.जिल्हाधिकारी जालना यांच्या सुचना आहेत. सदरील अपुर्ण असलेली कामे सध्या पुर्ण होत आलेली आहेत. लवकरच पुर्णत्वाचा दाखल्यासह मा.जिल्हाधिकारी जालना यांना अहवाल सादर करण्यांत येईल. |

| अ. क्र. | मुळ प्रकरण दाखल दिनांक | तक्रारदाराचे नांव व पत्ता | विषय | प्रकरणाची सदयस्थिती. |
|---|---|---|---|---|
| ३ | दि.५/४/२०१० | श्री निवृत्ती दत्तू साबळे व इतर गांवकरी मंडळी रा.मौ.धावेडी थार ता.जि.जालना | मौजे धावेडी थार जोड रस्त्याचे डांबरी करणाचे कामामध्ये फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने सदर रोडच्या कामाची चौकशी करुन संबंधीत अधिकारी व गुत्तेदार यांचेवर कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत व कामाच्या बिलास स्थगिती देणे बाबत. | सदर प्रकरणी कार्यरत अभियंता सा.बां.विभाग जालना यांनी सुचनेनूसार सदर कामाची दि.२६/११/२०१० रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असून सदर काम सुस्थितीत असल्याबाबतचा अहवाल पत्र क्र.६०५५ दि.२६/११/२०१० रोजी मा.जिल्हाधिकारी जालना यांना सादर करुन सदर प्रकरण निकाली काढण्यास्तव विनंती केलेली आहे. |
| ४ | दि.३/५/२०१० | जुमान चाऊस नासेर चाऊस सदस्य जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती जालना | सा.बां.उप विभाग उत्तर जालना येथील उप अभियंता ताजी, कनिष्ठ अभियंता तोबरे, कोल्हे, गायकवाड यांनी संगनमताने ३१ मार्च रोजी उचललेल्या एक कोटी ४० लाखाच्या बोगस बीलाची चौकशी करुन संबंधीतांना निलंबीत करणे बाबत. | सदर प्रकरणी अर्जदाराने दिलेली मुळ तक्रार ही सा.बां.उप विभाग उत्तर जालना यांचे संबंधीत असल्याने त्यांचेकडून वस्तुनिष्ठ अहवाल मागविण्या करिता या कार्यालयाचे पत्र क्र.३७९२/१ दि.३०/७/२०१० अन्वये सुचना दिलेली आहे. अदयाप अहवाल प्राप्त नाही त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. लवकरच योग्य ती कार्यवाही करुन प्रकरण निकाली काढण्याकरिता मा.जिल्हाधिकरी जालना यांना विनंती करण्यांत येईल. |

**कार्यकारी अभियंता**

**सा.बां.विभाग जालना.**